सचिवांनी/जिल्हा पालक सचिवांनी शासकीय योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्याकरिता प्रत्येक महिन्याच्या पहिला शुक्रवार व शनिवार आणि तिसरा शुक्रवार व शनिवार या दिवशी क्षेत्रीय स्तरावर भेट देण्याबाबत.....

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण- १८१५ / प्र. क्र. ६६ / १८ -अ

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २ जानेवारी, २०१६

परिपत्रक :

शासनाचे धोरणात्मक निर्णय, प्रशासकीय सुधारणा आणि विविध लोकोपयोगी व कल्याणकारी योजना यांची क्षेत्रीय स्तरावर अधिक प्रभावीपणे अमंलबजावणीकरिता **खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे निर्देश सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव व सचिव यांना देण्यात येत आहेत:-**

१. प्रत्येक महिन्यातील पहिला शुक्रवार व शनिवार तसेच तिसरा शुक्रवार व शनिवार या दिवशी सचिवांनी क्षेत्रीय दौरा करावा.
२. दौऱ्यामध्ये आपल्या आपल्या विभागाशी संबंधित क्षेत्रीय कार्यालये व ग्रामीण / शहरी भागात स्वत: भेटी द्याव्यात व शासकीय योजनांच्या अंमलबजावणीची प्रत्यक्ष पहाणी करावी.
३. तसेच जिल्ह्याचे पालक सचिव म्हणून दौरा करीत असताना त्यांनी जिल्ह्यातील विविध कल्याणकारी योजनांच्या अमंलबजावणी संदर्भात विशेषत: जिल्हा वार्षिक योजना, राज्य व केन्द्र शासनाच्या फ्लॅगशीप योजना (Flagship Scheme), राज्य शासनाच्या महत्वाच्या योजना, विशेष घटक योजना, आदिवासी विकास योजनांच्या भौतिक व आर्थिक प्रगतीबाबत विस्तृत आढावा घ्यावा. याबद्दल वेळोवेळी दिलेल्या सूचनांनुसार योजनांची तसेच तद्संबंधितच्या तक्रारीचे निराकरण याबाबत सर्वकष आढावा घ्यावा.
४. वरील योजनांचा आढावा घेण्याकरिता सर्व संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्यांशी विचारविनिमय करण्यात यावा आणि जिल्ह्यातील नागरिक / लाभार्थी यांच्या समवेत चर्चासत्र आयोजित करून योजनांची अंमलबजावणी तसेच तद्संबंधीच्या तक्रारीचे निराकरण करण्याबाबत सर्वकष आढावा घ्यावा.
५. आपल्या विभागाशी संबंधित कार्यालयांच्या सखोल तपासण्या कराव्यात व तद्नंतर मेमोरिडींग करावे. क्षेत्रीय कार्यालयांना भासत असणाऱ्या अडचणीचे निराकरण करावे.
६. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव हे त्यांच्या विभागाच्या योजनांचा आढावा घेऊन अंमलबजावणीचा प्रगती अहवाल मुख्य सचिव यांना सादर करतील. त्यामध्ये योजनांचे स्वरुप व अंमलबजावणीत काही सुधारणा करणे आवश्यक असल्यास तसा स्पष्ट उल्लेख अहवालात नमूद करावा.
७. आढाव्यात निदर्शनास आलेल्या त्रुटी दुर करण्याची कार्यवाही तत्परतेने करावी व याबद्दल योजनेचे सुलभीकरण व कार्यपध्दतीत बदल करण्याच्या काही सूचना असल्यास तसे कळवावे.

२. वरीलप्रमाणे कार्यवाही करणे सुलभ व्हावे याकरिता मा.मंत्री / मा. राज्यमंत्री यांनी महिन्याचा पहिला शुक्रवार व शनिवार आणि तिसरा शुक्रवार व शनिवार या दिवशी मंत्रालय स्तरावर शक्य तो बैठका घेऊ नये असे

मा.मुख्यमंत्री महोदयांचे निर्देश असल्याची बाब संबंधित सचिवांनी खात्याच्या मा.मंत्री महोदयांचे निदर्शनास आणून द्यावी.

३. वरील प्रमाणे केलेली कार्यवाही संबंधित जिल्हा पालक सचिव यांच्या वार्षिक कार्यमुल्यांकन अहवालाचा (PAR) भाग समजण्यात येईल व त्यांचा विचार वार्षिक मुल्यांकन करताना करण्यात येईल. त्याचप्रमाणे क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या फलनिष्पती क्षेत्राचे (KRA) मुल्यांकन करताना देखील तिचा विचार करण्यात येईल.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१०२१५५०१०९१०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Swadheen S Kshatriya

Digitally signed by Swadheen S Kshatriya
DN: c=IN, o=All India Service, ou=Chief Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Swadheen S Kshatriya
Date: 2016.01.02 17:34:01 +05'30'

(स्वा शि क्षत्रिय)
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद/ विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२. सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य,
३. मा. राज्यपालांचे सचिव (५ प्रती),
४. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव (५ प्रती),
५. मा. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहायक,
६. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक,
७. मा. महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य,
८. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,
९. सर्व जिल्हा पालक सचिव,
१०. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
११. प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
१२. प्रबंधक , लोकायुक्त व उप लोकायुक्त यांचे कार्यालय,

१३. सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
१४. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१५. प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई,
१६. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, मुंबई,
१७. सर्व विभागीय आयुक्त,
१८. सर्व जिल्हाधिकारी,
१९. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२०. सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख/प्रादेशिक प्रमुख /कार्यालय प्रमुख,
२१. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (५ प्रती),
२२. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
२३. निवड नस्ती (कार्यासन १८-अ).